| MHNG090021742021 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक | ०९/१०/२०२१ |
| | नोंद दिनांक | ०९/१०/२०२१ |
| | न्यायनिर्णय दिनांक | ०६/०५/२०२६ |
| | कालावधी | ०४व. ०६ म. २७दि. |

# फॉर्म नं.XXXII

## भाग–अ

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(i) अन्वये)

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.१), सावनेर यांचे न्यायालय**

(पिठासीन अधिकारी प्रदिपसिंह पृथ्वीराजसिंह ठाकूर)

(दिनांक ०६ मे, २०२६)

नियमित फौजदारी खटला क्र. ३१४/२०२१ नि. क्र.३१.

अपराधः भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ अन्वये.

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार तर्फे**<br>**केळवद** पोलीस ठाणे, सावनेर,<br>ता. सावनेर, जिल्हा नागपूर. |
| **विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता** | **श्री. टी. एस. आरगे** |
| **आरोपी** | **शिवहरी नयनसुख कमाले,**<br>वय ५४ वर्षे, व्यवसाय – रोजमजुरी,<br>रा. वार्ड क्र. ३, खानगाव,<br>ता. सावनेर, जि. नागपूर. |
| **आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ** | **श्री. एन. बी. बिहोने** |

## भाग–ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १८/०५/२०२१ |
| फिर्याद दाखल दिनांक | १८/०५/२०२१ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | ०९/१०/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ०४/०९/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १३/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०६/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वाये समायोजीत करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शिवहरी नयनसुख कमाले** | सूचनापत्र दिले | ०७/०२/२०२३ | भारतीय दंड विधान,१८६० कलम ३२४ अन्वये | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

# भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | जितेंद्र बाबारावजी बोढे | फिर्यादी | १७ |

**ब. आरोपी** (साक्षीदार तपासणेत आला असल्यास)

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालय** (साक्षीदार तपासणेत आला असल्यास)

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाने/आरोपीने/न्यायालयाने सिध्द झालेली/निशाणी पडलेली कागदपत्रे

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | नि.क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ब. बचावपक्ष** (बचावपक्षातर्फे खालील कागदपत्रे मान्य करण्यात आली आहेत.)

| अ.क्र. | निशाणी | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## क. न्यायालयाने निशाणी दिलेली कागदपत्रे

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक. |

## ड. मुद्देमाल

| अनु.क्र. | आर्टीकल क्रमांक | मुद्देमालाचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

(घोषीत आज दिनांक ०६ माहे मे, २०२६ रोजी)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ अंतर्गत खटला चालविण्यात आला.

०२. अभियोगपक्षाचा खटला थोडक्यात असा की, दिनांक १८/०५/२०२१ रोजी सायंकाळी ०६.०० ते ०६.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादी हा त्याचे वडील बाबाराव बोढे यांना भेटण्याकरिता गेला असता त्याच्या वडिलांनी त्यास सांगितले की, रात्री घरा शेजारी राहणारा शिवहरी कमाले याने त्यांच्यासोबत झगडा भांडण केले. यावरून फिर्यादीने आरोपी शिवहरी कमाले यास त्याच्या वडिलासोबत कशासाठी झगडा भांडण केला अशी विचारणा केली असता आरोपी शिवहरी याने फिर्यादीस शिवीगाळ केली व खाली पडलेला दगड उचलुन त्याच्या डोक्यावर मारला त्यामुळे त्याचे डोके फुटुन रक्त आले व त्याच्या उजव्या

छातीस चावा घेतला. करीता, फिर्यादीने तोंडी फिर्याद दिली.

०३. सदर फिर्याद वरुन केळवद पोलीसांनी आरोपीविरुध्द गुन्हा क्र.८५/२०२१ नोंदविला. सदर घटनेचा तपास सहाय्यक फौजदार/१५५६ श्री. अमरदिप कामठे यांच्याकडे सोपवण्यात आला. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी दोन पंचांना समंस देवून घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे हस्तगत केली, आरोपीला अटक केली. तपासाअंती, पुरावा हाती आल्यामुळे आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०४. दोषारोपपत्र व त्यामध्ये सामिल कागदपत्रांच्या आधारे आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२४ अन्वये दोषारोप (नि.क्र. १३) ठेवला, तो आरोपीस त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला असता, आरोपीने गुन्हा नाकबूल केला (नि.क्र.१४) व संपरिक्षणाची तयारी दर्शवली. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षातर्फे केवळ फिर्यादीला तपासण्यात आले. प्रस्तुत प्रकरणात आरोपी व फिर्यादी यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याबाबत संयुक्त पुरसिस (नि.क्र.१६) दाखल केली आहे. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया

संहिता, कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**०५.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुराव्यावरुन खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले. त्यावर मी माझ्या कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे:—

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १८/०५/२०२१ रोजी ०६.०० ते ०६.३० वाजताच्या दरम्यान मौजा खानगाव, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर येथे आरोपीने फिर्यादी जितेंद्र बाबाराव बोढे यास दगडाने त्याच्या डोक्यात मारले व छातीच्या उजव्या बाजूला चावा घेवून इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे त्याने **भारतीय दंड विधान, कलम ३२४** अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र णे मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीताः</u>—**

०६. आरोपीवरील गुन्हा शाबीत करणेसाठी अभियोग पक्षाने हे सिध्द

करणे गरजेचे आहे की, दिनांक १८/०५/२०२१ रोजी ०६.०० ते ०६.३० वाजताच्या मौजा खानगाव, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर येथे आरोपीने फिर्यादी जितेंद्र बाबाराव बोढे यास दगडाने त्याच्या डोक्यात मारले व छातीच्या उजव्या बाजूला चावा घेवून इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली.

**०७.** अभियोगपक्षाकरीता फिर्यादी जितेंद्र बोढे याचा पुरावा खूप महत्वाचा होता, परंतु फिर्यादीने अभियोग पक्षास साथ दिली नाही. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात तो आरोपीला ओळखतो, तो त्याच्या घराजवळ राहतो. सन २०२१ मध्ये त्यांचे आरोपीसोबत भांडण झाले होते. त्यामुळे त्यांनी रागाच्या भरात पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली. फिर्यादीने फिर्याद व छापील प्रथम खबरवरील त्याची सही ओळखली, परंतु त्यातील मजकूर माहित नसल्याचे कथन केले. सबब, अभियोग पक्षातर्फे फिर्यादीस उलटतपासात अनुज्ञेय असणारी बरीच उत्तरसुचक प्रश्ने विचारण्यात आली. परंतू त्यातदेखील आरोपीने त्यास दगडाने मारुन जखमी केल्याचे तसेच छातीच्या उजव्या बाजूला चावा घेतल्याचे साफ नाकारले आहे. याउलट, फिर्यादीने त्याचे आरोपीसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याची बाब मान्य केली आहे.

**०८.** अभियोगपक्षाचे महत्वाचे साक्षीदार फिर्यादी जितेंद्र याने

अभियोगपक्षाच्या कथनास समर्थन न केल्यामुळे अभियोगपक्ष फिर्याद सिध्द करु शकला नाही. फिर्यादीने आरोपी व त्याच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे कथन केले आहे व तशी संयुक्त तडजोड पुरसीस (नि.क्र.१६) अन्वये दाखल केली आहे. त्यामुळे सदर खटल्यात अभियोग पक्षाने इतर साक्षीदार, तपासी अंमलदार, पंच, तसेच वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष नोंदवली नाहीत. सबब, आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरिता अभिलेखावर कोणताही प्रत्यक्ष अथवा परिस्थितीजन्य पुरावा उपलब्ध होऊ शकला नाही.

०९. एकंदरीत अभियोग पक्षाचे महत्वाचे साक्षीदार फिर्यादी याने आरोपीविरुध्द काहीही न सांगितल्यामुळे घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस दगडाने त्याच्या डोक्यात मारले व छातीच्या उजव्या बाजूला चावा घेवून इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली, या बाबी पुराव्या आभावी सिध्द होवू शकल्या नाहीत. सबब, आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, कलम ३२४ अन्वये गुन्हा सिध्द झाला नाही. म्हणून मी **मुद्दा क्र.१** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

***<u>मुद्दा क्र. २ करिता</u>***:–

१०. मुद्दा क्र.१ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपीस भारतीय दंड विधान, कलम ३२४ अन्वयेच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करणे न्यायोचीत ठरते.

प्रस्तूत प्रकरणातील जप्त मुद्देमाल ओबड धोबड दगड हा मुल्यहिन असल्यामुळे नष्ट करणे, योग्य होणार आहे. आरोपीने यापूर्वीच फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ च्या पुर्ततेकरिता वैयक्तीक बंधपत्र व जामिनपत्र नव्याने दिली आहेत. सबब, मुद्दा क्र.२ करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:–

## आ दे श

१. आरोपी **शिवहरी नयनसुख कमाले** याची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ प्रमाणेच्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये **निर्दोष मुक्तता** करण्यात येत आहे.

२. प्रस्तूत प्रकरणातील जप्त मुद्देमाल ओबड धोबड दगड हा मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा.

३. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करणेत येत आहेत.

(खुल्या न्यायालयात टंकलिखित करुन घोषीत करण्यात आला).

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2026.05.06 17:00:45 +0530

सावनेर.
दिनांक ०६/०५/२०२६.

**(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)**
न्याय दंडाधिकारी प्रथमवर्ग
[न्यायालय क्र.१], सावनेर

## -:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Misal |
| Court Name | :- | Judicial Magistrate First Class (Court No.1), Saoner |
| Date of decision | :- | 06/05/2026 |
| Order signed by PO. on | :- | 06/05/2026 |
| Order uploaded on | :- | 06/05/2026 |